| MHKO050032132022 | **म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. १०३/२०२२**<br>**निशाणी क्र. ४ वर आदेश**<br>(प्रतिक्षा बलराम कोरे<br>वि.<br>बलराम मल्लापा कोरे व इतर ) |
|---|---|

**१.** यातील अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम २३ नुसार अंतरीम आदेशाकरिता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदार यांनी वि.प. यांचे विरोधात कौंटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये कोर्ट मजकूरी अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज चालणेस दिनावधी लागणार आहे. सदर कालावधीत अर्जदार यांना कोणतेही उत्पनाचे साधन नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे अंतरिम आदेश मिळण्याकरीता अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मुळ अर्जात केलेली सर्व कथने ही अंतरिम अर्जाचा भाग समजण्याची विनंती केली आहे.

**३.** अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदारने असे कथन केले आहे की, दि.०७/०७/२०१६ रोजी अर्जदार व वि.प.नं.१ यांचा विवाह झालेला आहे. अर्जदार व वि.प.नं.१ यांचे दरम्यान अद्यापही पती–पत्नी नाते अस्तित्वात आहे. तसेच अर्जदार व वि.प.नं.१ यांचे पासून दि.०६/०१/२०१९ रोजी कु. श्लोक नावाचा मुलगा झाला व विवाहानंतर सुरवातीचे काही दिवस वि.प. यांनी त्यांना व्यवस्थीत नांदवले. वि.प. न. १ हे नायजेरिया येथे नोकरीस होते परंतु त्यांना तेथे दारु पिऊन दंगा केलेने लग्नापुर्वीच नोकरीवरुन काढले होते. तरीही वि.प. हे

नायजेरिया येथे नोकरीस आहेत असे सांगुन अर्जदार व त्यांच्या घरच्यांची फसवणूक केली आहे. तरीही अर्जदार नं १ यांनी झाले गेले सगळे विसरुन आपण आपल्या वैवाहिक आयुष्याची नवीन सुरुवात करु असे सांगितले. त्यानंतर वि.प.नं. ४ व ५ हे सतत अर्जदार यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत वरचेवर भांडण करत असत. वि. प. यांनी अर्जदार यांची पालनपोषणाची जबाबदारी नाकारली आहे. गैरवर्तणुक आणि व्यसन करुन वि. प. हे अर्जदार यांना त्रास देत असे. वि. प.नं १ यांना श्री. महालक्ष्मी कॅलेडंर कागल येथे नोकरी लागली परंतु त्यांना नोकरीस ये जा करणेस त्रास होत असलेने अर्जदार नं १ यांना घेऊन कागल भाडयाने राहू लागले. त्या दरम्यान अर्जदार नं १ हया गरोदर राहिल्या. तरीही वि.प. नं. १ यांच्या वागण्यात बदल झाला नाही. त्या ठिकाणीही वि. प. नं १ हे दारु पिवून अर्जदार नं १ यांना शिवीगाळ करणे, दारु पिऊन त्रास देणे, अर्जदार नं १ यांच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागले. वि. प. १ व अर्जदार नं १ हे त्यानंतर काही दिवस अर्जदार नं. १ यांच्या आईवडिलांच्या घरी राहणेस आले परंतु वि. प. नं १ यांचे वागणेत काहीही फरक पडला नाही. अर्जदार नं. १ व तिचे घरचे लोकांनी वि. प. यांचेकडे अर्जदारांना व्यवस्थित नांदवून घेणेबाबत वेळोवेळी प्रयत्न केले. तसेच वि.प.नं.१ हे दररोज रात्री, अपरात्री घरी येवून अर्जदार यांचा शरिरीक व मानसिक त्रास देवून मारहाण करत असत. वि.प. यांनी अर्जदार यांच्या पालनपोषनाची कोणतीही जबाबदारी घेतलेली नव्हती व नाही. त्यामुळे अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांच्या विरुध्द दाखल केला आहे.

४. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, वि.प. यांची आर्थिक परिस्थिती खूप चांगली आहे. वि.प.नं.१ यांचा एम. ए. व प्रिटींग पॅकीग डिप्लोमा झालेला असुन ते श्री. महालक्ष्मी कॅलेंडर कागल येथे नोकरीस असून त्यांना दरमहा २५,०००/–

इतका पगार मिळतो. वि.प. नं. १ यांचे वडील महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कार्पोरेशन मधुन सेवानिवृत्त असून त्यांना दरमहात्यांना दरमहा रु. २०,०००/– पेंशन मिळते. वि.प.नं.१ यांची वडिलोपार्जीत दिड एकर शेती व दूध व्यवसाय असून शेती मधून त्यांना वार्षीक रु. १,५०,०००/– व दुध व्यवसायातून दरमहा रु. ६,०००/– इतके उत्पन्न मिळते. वि.प. नं.१ यांचेवर अर्जदार यांचेशिवाय कोणीही अवलंबून नाही. अर्जदार या सध्या माहेरी आपल्या मुलगा श्लोकसह आईवडीलांच्याकडे आश्रीतासारखे जीवन जगत आहेत. त्यामुळे अर्जदार नं.१ व २ यांना घरखर्च, कपडेलत्ता, औषधोपचार, शिक्षण, फोन व इतर खर्च इ. साठी अर्जदार नं. १ यांना रुपये ३,०००/– व अर्जदार यांना दरमहा रु. २,०००/– इतकी दरम्यानची पोटगी वि.प.यांनी देणेविषयी तसेच वि.प. यांनी अर्जदारांविरुध्द गैरकृत्ये करणेस प्रतिबंद करुन अर्जदारांच्या हितासाठी संरक्षणाचा आदेश होणेविषयी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

**५.** वि.प.नं.१ यांनी नि. १४ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जदारच्या अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. वि.प. यांच्या कथनानुसार वि.प.यांनी अर्जदारवर कोणताही कौंटुंबीक हिंसाचार केलेला नाही. वि.प. यांनी अर्जदारसोबतचे नाते कबूल केले आहे. वि.प. यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हया वि. प. कडे थोडे दिवस व्यवस्थित नांदल्या. काही दिवसानंतर वि.प. सोबत विनाकारण भांडण करु लागल्या. अर्जदार यांना नवीन व्यक्तीसोबत जमवून घेण्याकरिता थोडा वेळ लागेल असे समजून यातील वि.प. सदर गोष्टी कडे दुर्लक्ष करत होते. अर्जदार काही ना काही कारण काढून वारंवार माहेरी जाण्यासाठी वि. प. यांच्याकडे सारखा तगादा लावत होत्या. अर्जदार वि.प. याना अपमानास्पद वागणूक देत. अर्जदार तसान्तास त्यांच्या घरच्यांशी फोनवर बोलत असत. वि.प. यांनी अर्जदाराला

कोणाशी बोलत आहेस असे विचारलेवर अर्जदार चिडून भावाला बोलवून घेवून माहेरी गेल्या.

**६.** वि. प. यांचे आईवडील वयोवृध्द आहेत त्यांना सांभाळायचे नसल्याने अर्जदाराला त्यांचे घरी कडेगाव येथे राहण्यास जराही स्वारस्य नसल्याने अर्जदार व अर्जदाराचे माहेरचे लोक वि.प. यांना ज्या ठिकाणी नोकरीसाठी जायचे तेथे अर्जदाराला घेवून जायचे असा हट्ट करीत होते. तसेच अर्जदार यांनी माहेरच्या व्यक्तीशी संगनमत करुन यातील वि. प. यांना घरजावई करण्याच्या उद्देशाने वि. प. यांना माहेरी घेऊन जात असत. अर्जदार यांच्या घरचे लोक वि. प. यांना शिवीगाळ करुन अर्जदार हिच्याशी संसार करायचा असेल तर तुला घर जावई म्हणून राहावे लागेल अशी धमकी देत. अशा प्रकारामुळे वि.प. यांना मानसिक त्रास झाला. परंतु तरीही वि.प. अर्जदार यांना नांदणेस येणेबाबत विनंती केली परंतू अर्जदार यांनी ऐकले नाही. म्हणून ते नाईलाजने अर्जदार यांच्या घरी राहणेस गेले. तिथे राहून वि. प. हे महालक्ष्मी कॅलेंडर कागल येथे नोकरी करत असताना अर्जदार वि.प. यांचा सर्व पगार काढून घेत असे. तसेच अर्जदार यांची आईही वि.प. यांना अपमानास्पद वागणूक देत होती. वि. प. यांनी त्यांचे पगारामधून अर्जदाराला ब्युटीपार्लर काढून दिले आहे त्यावर अर्जदार तिचा चरीतार्थ चालवित आहे.

**७.** वि.प. हे वरील सर्व सहन करुनही अर्जदारासोबत राहात होते. परंतू दि. २७/०२/२०२० रोजी अर्जदार व तिचे घरचे मंडळीनी वि. प. यांच्याशी भांडण करुन त्यांना घरातून हाकलवून दिले. तसेच अर्जदार यांना विचारणा केली असता वि. प. यांना हुपरी पोलीस ठाणेत खोटी तक्रार दाखल करणार अशी धमकी दिली. तरी देखील वि.प. यांनी अर्जदारांशी नांदणेस येणेबाबत विचारणा केली असता

अर्जदाराने नांदणेस येण्यास स्पष्ट नकार दिला. तसेच मध्यस्थीमार्फत तडजोडीसाठी विचारले असता अर्जदारांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

८. वि.प. यांनी पती म्हणून सर्व कर्तव्य पार पाडलेली आहेत. अर्जदार या वि.प. यांचा त्याग करुन माहेरी निघून गेल्या आहेत. अर्जदार यांच्या अशा वागण्यामूळे वि.प. यांना खूप मानसिक त्रास झाला आहे. वि. प. यांनी अर्जदारांना कधीही त्रास दिलेला नाही. अर्जदाराने स्वत:चा गैरप्रकार झाकण्यासाठी वि. प. यांचेविरुध्द खोटया स्वरुपाचा अर्ज दाखल केला आहे.

९. वि. प. नं. २ ते ५ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविण्यात येत आहे.

**१०.** दोन्ही बाजुंचे विधिज्ञांचा विस्तृत युक्तीवाद ऐकणेत आला. अर्ज, अर्जदारचे शपथपत्र, वि.प.नं.१ यांचे म्हणणे व दोन्ही पक्षकारांनी दाखल केलेली मालमत्ता उत्पन्न व दायीत्व बाबतची शपथपत्रे, कागदपत्रे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्याकडे उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्दयांवर कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे सादर केले आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदारवर वि.प. यांनी घरगुती हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी सिध्द होते काय ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार अंतरिम पोटगी संबधीचे आदेश व संरक्षणाचा आदेश मिळणेस पात्र आहेत का ? | अंशतः मंजूर |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## – <u>कारणमिमांसा</u> –

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत</u> :–**

**११.** वरील मुद्दे एकमेकांशी सलंग्न असल्यामुळे त्यावर दिलेल्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चिले आहेत.

**१२.** वि.प. यांनी अर्जदार सोबत विवाह झाल्याचे व त्यांना मुलगा श्लोक असल्याचे नाकारलेले नाही. त्यामुळे अर्जदार व वि.प. यांच्यामध्ये वैवाहीक नातेसंबंध होते हे सिध्द होते. अर्जदार यांनी त्यांचे मुळ अर्जात कथन केलेप्रमाणे वि.प. यांनी अर्जदार यांना वेळोवेळी मानसिक व शारिरीक त्रास दिलेला आहे. अर्जदारच्या कथनानुसार वि.प. हे नायजेरिया येथे नोकरीस असल्याचे खोटे सांगून अर्जदाराशी विवाह केला. तसेच लग्नादिवशी वि.प.न. १ यांनी दारु पिऊन दंगा केला. तसेच वि.प. नं. १ हे रोज दारु पिऊन अर्जदार नं. १ सोबत भांडण करत तसेच विक्षीप्तपणे वागत होते. तसेच इतर वि.प. अर्जदार नं. १ ला तुझ्या पायगुणामुळेच मुलाची नोकरी गेली म्हणून अश्लील भाषेत शिवीगाळ करत.

**१३.** अर्जदारने तिच्या कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. याउलट वि.प.नं.१ यांचे नि.१४ कडील म्हणणे पाहिले असता त्यामध्ये अर्जदार यांनी केलेल्या आरोपाबाबत वि.प. यांनी अर्जदारची सर्व कथने नाकारुन अर्जदार हिच्यावर ती व्यवस्थीत नांदत नसल्याचे कथन केले आहे. वि.प. यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की अर्जदार ही कोणत्याही सबळ कारणाशिवाय स्वतःहून घर सोडून गेली आहे. वि.प.यांनी अर्जदार हिचा त्याग केलेला नाही. तसेच ती ब्युटीपार्लर व्यवसाय करते व त्यामधुन येणा-या उत्पन्नातून तीचा चरीतार्थ चालवू शकते. अर्जदार हे सध्या कोणताही कामधंदा करीत नसल्याने त्यांच्याकडे उत्पनाचे

साधन नाही. त्यामुळे अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र नाही. तसेच वि.प. यांनी मालमत्ता, उत्पन्न व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जात नमुद केलेल्या कथीत कौटुंबीक हिसांचाराबाबत तिचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी मालमत्ता, उत्पन्न व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे.

**१४.** वि.प. यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कौटुंबीक हिसांचाराबाबतची सर्व कथने नाकारली आहेत व अर्जदार हिच्यावर ती व्यवस्थीत नांदत नसलेची कथने केलेली आहेत. तसेच अर्जदार नं.१ या स्वतः माहेरी निघून गेले असल्याचे कथन वि.प. यांनी केले आहे. परंतु केवळ वि.प.यांनी तिला घराबाहेर काढलेले नाही याकारणांवरुन तिच्यावर कौटुंबीक हिसांचार झालेलाच नाही असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. तसेच अर्जदार व वि.प.नं.१ यांना मुलगा श्लोक असल्याचे वि.प.यांना कबूल आहे. तसेच अर्जदार ह्या आपला मुलगा श्लोकला घेवून वि.प.नं.१ यांना सोडून गेल्यापासून शलोक अर्जदार यांचेकडेच राहत आहे. त्याचे पालन पोषण अर्जदार याच करतात. वि.प.नं.१ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कोठेही त्यांनी अर्जदार यांच्या पालनपोषनासाठी काही तजवीज केल्याचे कथन केलेले नाही.

**१५.** अर्जदार नं.१ व २ यांच्या पालनपोषनाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही वि.प.नं.१ यांचीच आहे. अर्जदार नं.२ याच्या जन्मापासून ते आजअखेर तिच्या पालनपोषनासाठी अगर औषधोपचारासाठी काय तजवीज केली याबाबत वि.प. यांनी कोणतेही कथन केलेले नाही. कोणतीही विवाहीत स्त्री विनाकारण पतीचा त्याग करुन माहेरी राहण्यास जाणार नाही. अर्जदारच्या अर्जातील कथने व याकामी अर्जदार व वि.प. यांनी हजर केलेल्या शपथपत्र व कागदपत्रांचे

अवलोकन केले असता, प्रथमदर्शनी अर्जदारच्या कथनामध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार हिचेवर कौंटुंबीक हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत यामध्ये सत्यता दिसून येते.

**१६.** वि.प.नं.१ यांनी अर्जदार हया माहेरी राहत असल्याचे नाकारलेले नाही. अशा परिस्थितीत वि.प.नं.१ यांनी अर्जदार व तिच्या मुलाची उदरनिर्वाहाची सोय पाहणे गरजेचे आहे. अर्जदारच्या कथनानुसार त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदारच्या कथनानुसार वि.प. हे उच्चशिक्षीत असून महालक्ष्मी कॅलेंडर, कागल एम.आय.डी.सी. येथे नोकरी करत असून त्यांना दरमहा रु. २५,०००/– इतका पगार असल्याचे कथन केले आहे. अर्जदार हीने निशाणी २१ सोबत वि.प. नं. १ यांचे बँक ऑफ इंडियाचे सेव्हीग्ज पासबुक हजर केले आहे. परंतू ते २०१८–२०१९ सालातील आहे. अर्जदार यांनी वि.प.नं.१ यांच्या नोकरीबाबत इतर कोणत्याही प्रकारचा पुरावा अगर कागदपत्रे सदर कामी हजर केलेली नाहीत. तसेच अर्जदार यांनी शपथपत्रामध्ये वि. प. याच्या शेती पासूनच्या उत्पन्नाचा उल्लेख केला आहे परंतू त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच वि.प. हे जर सध्या नोकरी करत असतील तर अर्जदारला वि.प. न. १ चे वेतन प्रमाणपत्र दाखल करता आले असते. परंतु अभिलेखावर अर्जदार हिने कोणतेही वेतन प्रमाणपत्र दाखल केले नाही.

**१७.** वि.प. याच्या कथनानुसार अर्जदार ही ब्युटीपार्लरचा व्यवसाय करते व त्यामधुन ती तीचा चरीतार्थ चालवू शकते. परंतू अर्जदार सदर व्यवसाय करत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. यावरुन अर्जदार ही ब्युटीपार्लरचा व्यवसाय करते किवा कसे हे स्पष्ट होत नाही.

तसेच वि.प. यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये ते पूर्वी कागल येथे नोकरीस असल्याचे मान्य केले आहे. तसेच अर्जदार यांनी दाखल केलेल्या पासबुकावरुन अर्जदार याना त्यावेळी पगार मिळत असल्याचे दिसून येते. अर्जदाराने जरी तो सध्या काही कामधंदा करत नसल्याचे कथन केले असले तरी अर्जदार हा शिक्षीत असल्याने काहीतरी व्यवसाय अगर नोकरी करु शकतो. यावरुन प्रथमदर्शीनी असे दिसून येते की, वि.प.नं.१ यांना दरमहा ठरावीक उत्पन्न आहे.

**१८.** अर्जदार यांनी वि.प. यांचेकडून त्यांचे जीवतास धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे वि.प. यांनी अर्जदाराविरुध्द गैरक्त्ये करणेस प्रतिबंद करुन अर्जदाराचे हितासाठी संरक्षणाचा आदेश होवून मिळणे विषयी विनंती केली आहे. तथापी अर्जदाराचे अर्जातील कथन पाहता ती सध्या तिच्या माहेरी आईवडीलांकडे राहात आहे. तसेच ती विभक्त राहत असल्यापासून वि.प. यांनी ती राहात असलेल्या ठिकाणी येवून अर्जदारला त्रास दिला याबाबत अर्जात कथन नाही. तसेच त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावाही अभिलेखावर दिलेला नाही. तसेच अर्जदार विभक्त राहात असलेपासून वि.प. याने काय गैरकृत्य केले आहे याबाबतही उल्लेख नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील सर्व पुरावा अभिलेखावर येण्यापूर्वी अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे अर्जदाराचे संरक्षणाचा आदेश पारित करणे योग्य होणार नाही.

**१९.** त्यामुळे अर्जदार व वि.प.नं.१ यांचे मधील वैवाहीक नातेसंबंध लक्षात घेता अर्जदारच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची प्राथमिक जबाबदारी ही वि.प.नं.१ यांची आहे. अशा परिस्थितीत वि.प.नं.१ यांनी अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरिम आर्थिक मदत म्हणून अर्जदार नं.१ यांना दरमहा ( रुपये ३,०००/-) व अर्जदार नं. २ यांना ( रुपये १,०००/-) अशी एकत्रीत दरमहा रक्कम रुपये ४,०००/-

प्रति महिना देणेबाबत आदेश करणे योग्य होईल. सबब मुद्दा क्रमांक १ चे होकारार्थी उत्तर देवून, मुद्दा क्रमांक २ अशंतः मंजुर करण्यात येतो व मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प.नं.१ यास असे आदेशित करण्यात येते की त्यांनी अर्जदार नं.१ यांना ( रुपये ३,०००/-) व अर्जदार नं. २ यांना ( रुपये १,०००/-) अशी एकूण अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ४,०००/-(फक्त चार हजार रुपये) अर्ज दाखल तारखेपासून ते मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत द्यावेत.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर)

सही/-

**दि. ०७/०३/२०२४** **(संजय दि.वानखेडे)**
**इचलकरंजी** **न्यायदंडाधिकारी वर्ग-१, कोर्ट नं.५ इचलकरंजी**